कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७८० /२०२६ दि. ०३/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत कावेरी चौक, नानासाहेब धर्माधिकारी मार्ग, डोंबिवली पूर्व येथे डॉ. श्रीकांत शिंदे मित्र परिवार, डोंबिवली पूर्व यांचे वतीने दिनांक ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०९:०० ते २२:०० वा. पावेतो दहिहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) आर.आर.हॉस्पीटल कडून कावेरी चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारचे वाहनांना **श्री गणेश रिक्षा स्टॅण्ड, एम्स हॉस्पीटल कडे जाणाऱ्या रोडलगत 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने एम्स हॉस्पीटल कडे जाणाऱ्या रोडवरून इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) इंडो अमाइन्स कंपनी कडून कावेरी चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारचे वाहनांना **एम.एस.ई.बी. बस स्टॉप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने एम.एस.ई.बी बस स्टॉप समोरील अशोक कदम मार्गाने मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) नेकणीपाडा येथून एम.आय.डी.सी अंतर्गत रस्त्याने कावेरी चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारचे वाहनांना **कामत हॉस्पीटल समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने कामत हॉस्पीटल समोरून डावीकडे वळण घेवून अशोक कदम मार्गाने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ४) श्री राम समर्थ कॅटरर्स पोळी भाजी केंद्र समोरून कावेरी चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारचे वाहनांना **सुदर्शन नगर उद्यान** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने साई बाबा मंदीर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दिनांक ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०९:०० वा. ते रात्री २२.०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.